शासकीय आदिवासी वसतीगृहामध्ये प्रवेश देण्याबाबत सुधारीत मार्गदर्शक तत्वे.

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक :- आवगृ-२०१९/प्र.क्र.१०३/का.१२
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दि. ३० ऑगस्ट, २०१९

वाचा :-

१) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक आवप्र-१२०४/प्र.क्र.५२/का-१२, दि.३.८.२००४.
२) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक आवगृ-१२०५/प्र.क्र.७६/का-१२, दि.२१.९.२००५.
३) आदिवासी विकास विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक आवगृ-१२०५/प्र.क्र.७६/का-१२, दि.१९.७.२००६.
४) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक आवगृ-२०१९/प्र.क्र.१०३/का-१२, दि.२०.८.२०१९.

प्रस्तावना :-

आदिवासी विकास विभागामार्फत राज्यातील अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींना तालुका, जिल्हा व विभागीय स्तरावर माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण घेता यावे याकरीता राज्यभरामध्ये शासकीय आदिवासी वसतीगृहे कार्यरत आहेत. सदर वसतीगृहांमध्ये विदयार्थ्यांना प्रवेश देण्यासंदर्भात उपरोक्त संदर्भाधीन क्र.१ येथील दि.३.८.२००४ च्या शासन निर्णयान्वये नियमावली लागू केलेली आहे. तसेच उपरोक्त संदर्भाधीन क्र.२ व ३ येथील दि.२१.९.२००५ व १९.७.२००६ च्या शासन निणर्यांन्वये सदर वसतीगृहांमध्ये विद्यार्थ्यांना खास बाब अंतर्गत प्रवेश देण्याबाबत तरतुद करण्यात आलेली आहे. शासकीय आदिवासी वसतीगृहांमध्ये विदयार्थ्यांना नियमानुसार प्रवेश प्रक्रीया व खास बाब म्हणून प्रवेश प्रक्रीयेच्या सध्याच्या तरतुदीमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

त्यानुसार शासकीय आदिवासी वसतीगृहांमध्ये विदयार्थ्यांना खास बाब म्हणून प्रवेश देण्यासंदर्भातील उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक २ ते ४ येथील दि.२१.९.२००५, दि.१९.७.२००६ व दि.२०.०८.२०१९ चे सर्व शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहेत.

शासन निर्णय :-

(१) सदर शासन निर्णयान्वये, संदर्भाधीन क्र.१ येथील दि.३.८.२००४ च्या शासन निर्णयातील, आदिवासी विभागाच्या वसतीगृहातील इतर मागासवर्गीय विदयार्थ्यांसाठी जागा राखून ठेवण्याची, “सर्वसाधारण” यामधील परिच्छेद (क) मधील तरतुद रद्द करण्यात येत आहे. यापुढे राज्यातील सर्व शासकीय आदिवासी वसतीगृहांमधील सर्व जागा फक्त आदिवासी विदयार्थ्यांमधून भरण्यात येतील.

(२) आदिवासी मुला-मुलीच्या प्रत्येक शासकीय वसतीगृहात प्रत्येक वर्षी रिक्त होणा-या जागांपैकी ५ % जागा अनुसूचित जमातीच्या विदयार्थ्यांमधूनच “खास बाब” म्हणून शासन स्तरावरुन भरल्या जातील.

(३) शासकीय आदिवासी वसतीगृहात खास बाब म्हणून प्रवेश घेण्याच्या तरतुदीत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना www.swayammahaonline.gov.in संकेतस्थळावर अर्ज करणे बंधनकारक करण्यात येत आहे.

(४) खास बाब म्हणून प्रवेश देताना वसतीगृह प्रवेश फक्त अभ्यासक्रमाच्या कालावधीकरीताच देण्यात यावा.

(५) खास बाब प्रवेशासाठी कुटुंबाच्या उत्पन्नाची मर्यादा शासनाने दि.३.८.२००४ रोजीच्या शासन निर्णयान्वये वसतीगृह प्रवेश नियमावलीसाठी विहित केल्याप्रमाणेच राहील.

(६) शासकीय आदिवासी वसतीगृहात खास बाब म्हणून विदयार्थ्यांना प्रवेश देण्यासंबधातील विदयार्थ्यांच्या यादया शासनस्तरावरुन मंजूर करुन संबधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांना दि.३० सप्टेंबर पर्यत पाठविण्यात येतील.

(७) दि.३० सप्टेंबर नंतर खास बाब अंतर्गत जागा हया “विना आराक्षित” समजून, संबधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांनी त्या जागा दि.३.८.२००४ च्या शासन निणर्यातील तरतुदीनुसार भरण्याची कार्यवाही करावी.

(८) रिक्त जागेअभावी वसतीगृहात प्रवेश देणे शक्य नसलेल्या विदयार्थ्यांचे अर्ज प्रकल्प अधिकारी यांनी स्वयंम योजनेकरीता विचारात घ्यावेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९०३११५९०४७६२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Subrao Narayan Shinde

Digitally signed by Subrao Narayan Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ffa7b5a27faed7560194e6272933cfa60dca1eb8ab54859eae7920c9d0d1f622, cn=Subrao Narayan Shinde
Date: 2019.09.03 12:05:45 +05'30'

(सु. ना. शिंदे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक.
२. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/नागपूर/अमरावती/ठाणे.
३. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
४. सर्व गृहपाल, आदिवासी मुला-मुलींचे शासकीय वसतीगृह (प्रकल्प अधिकारी यांचे मार्फत)
५. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखापरिक्षा), मुंबई /नागपूर.
६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
७. निवड नस्ती का-१२.